पत्र प्राप्त झाले
- 8 DEC 2025
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महा. पालिका मार्ग, मुंबई-१.

महाराष्ट्र शासन

# शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन धुळे.

विद्यानगरी , देवपूर ,धुळे – ४२४००५ फोन : ०२५६२ – २७२१०३ (कार्या)
Website-www.gpdhule.org.in Email : principal.gpdhule@dtemaharashtra.gov.in , stores.gpdhule@dtemaharashtra.gov.in

नोंदणी क्र. 92368
दिनांक 08.12.2025
कार्यविवरण क्र. 99

जा क्र :-शिमदाराशांतनिधु/के. भां/भंगार+ रद्दी विल्हे/२०२५-२६/ 1805
दिनांक :- 26 NOV 2025

## निविदा सुचना

शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे या संस्थेतील रद्दी व भंगार 'आहे त्या स्थितीत' खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन निविदा पद्धतीद्वारे विक्री करण्याचे ठरविले आहे . त्या अनुषंगाने ईच्छुक खरेदीदारांनी आपल्या जास्तीत जास्त दराच्या सिलबंद निविदा या संस्थेत विहीत कालावधीत, या कार्यालयातील – आवक / जावक नोंदणी विभागात दि:- 17.12 .2025 रोजी सायं ५:००वाजे पर्यत सादर कराव्यात.

सदर प्राप्त निविदा दि दि:- 18.12 . 2025 रोजी सकाळी ११:३० वाजता समिती समक्ष उपस्थित निविदाधारकांसमोर निविदा उघडण्यात येतील.

## अटी व शर्ती यांचा तपशिल खालील प्रमाणे

- **ईच्छुक खरेदीदारांनी निविदा सोबत आधार कार्ड , पॅन कार्ड व फर्मच्या नोंदणी प्रतची छायांकित प्रत व अनामत रक्कम रु. १५००/- (एक हजार पाचशे मात्र )चा राष्ट्रीयकृत बॅंकेचा धनाकर्ष (DD) ' प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, धुळे ' या नावाने सादर करणे अनिवार्य राहील, तसेच जीएसटी टिन नंबर नमूद करावा अन्यथा निविदा विचारात घेण्यात येणार नाहीत.**
- उल्लेखित रद्दी व भंगाराची पाहणी दि:- 17.12 . 2025 पर्यंत सुटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळात सकाळी ११:०० ते संध्याकाळ ४:०० वाजे पर्यंत राहील . यासंबंधी जास्तीची माहीती आवश्यक असल्यास या संस्थेचे भांडार अधिकारी/भांडारपाल यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क साधावा.
- निविदा दस्तऐवजाच्या प्रत्येक पृष्ठावर ईच्छुक खरेदीदाराची स्वाक्षरी केलेली असावी अपुर्ण किंवा स्वाक्षरी नसलेले निविदा नाकारल्या जातील. तसेच निविदा या कार्यालयात सादर केल्यानंतर त्यातील दरामध्ये फेरफार करता येणार नाही. संस्थेत उशिराने प्राप्त झालेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.
- निविदेतील दर्शविलेली दर /किंमत ही वाहतुक खर्च / लोडींग/ कामगार शुल्क इतर सर्व खर्चासह समावेश असणे आवश्यक आहे. तसेच रद्दी -५% जीएसटी व भंगार -१८% जीएसटी समावेशक आहेत किंवा नाही असे स्पष्ट नमूद करावे.
- ईमेलद्वारे पाठविलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
- ज्यांच्या निविदा स्विकारण्यात आल्या नाहीत त्यांच्या अनामत रक्कमेचे धनादेश परत करण्यात येईल .
- सर्वाधिक किंमतीच्या निविदारास विक्री आदेश संस्थेमार्फत दिले जाईल. सदर सर्व रद्दी / भंगार स्वखर्चाने या संस्थेतुन 'आहे त्या स्थितीत' खरेदी करणे आवश्यक राहील. तसेच किमान बाजारभावाप्रमाणे एवढे अथवा त्यापेक्षा जास्त दराने किंमत न आल्यास विक्री प्रक्रीया रद्द करण्यात येईल .
- संस्थेतील विक्री करण्यात आलेले रद्दी व भंगारातील मालाची निवड/ वर्गीकरण /वेल्डींग /कटींग इ प्रक्रीया संस्थेच्या परिसरात करण्याची परवानगी राहणार नाही.
- विक्री केलेल्या सर्व रद्दी व भंगार वितरण करण्यापूर्वी संबधित विभागामार्फत पडताळणी केली जाईल व तसेच रद्दी व भंगाराचे वजन हे संस्थेतील गठीत समिती समक्ष केले जाईल व त्यानुसार निवड झालेल्या खरेदीदाराने त्वरीत कार्यालयात विक्रीची एकुण रक्कम 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन, धुळे' यांचे नावे DD/ RTGS द्वारे भरावे लागतील. सदर विक्रीची एकुण रक्कम 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन, धुळे' यांचे खात्यावर जमा झाल्यावर व तसे याबाबत लेखा

विभाग- रोखपाल यांचेकडून रद्दी व भंगार विक्री रक्कमेची पावती भांडारास प्राप्त झाल्यावर संबधित खरेदीदाराला गेट पास द्वारे रद्दी व भंगार संस्थेतून बाहेर नेता येईल

**Name :- Principal Government Polytechnic, Dhule**

**Account number :- 11194931593, IFSC Code :- SBIN0008254**

- रद्दी व भंगाराचे आदेशान्वये 'प्राचार्य ,शासकीय तंत्रनिकेतन, धुळे' यांचे खात्यावर संपुर्ण विक्री रक्कम जमा झाल्यापासुन ५ दिवसाच्या आत सदर रद्दी / भंगार लोडींग करणे आवश्यक राहील ,दरम्यान त्याची जबाबदारी संस्थेवर राहणार नाही व तसेच लोडींग करतांना , वाहतुकी दरम्यान कोणतीही अनुचित घटना अथवा नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी किंवा भरपाई करण्याची संस्थेवर राहणार नाही.तसेच सदर रद्दी / भंगार विहित कालावधीत संस्थेतून न नेल्यास ,अनामत रक्कम रु.१५०० /- जप्त करण्यात येईल आणि साहित्य दिले जाणार नाही.
- महाराष्ट्र शासनाचे या संबधातील सर्व नियम व कायदे सर्व ईच्छुक खरेदीदारांना / निविदाधारकांना लागु व बंधनकारक असतील
- **सदर रद्दी व भंगार विक्री प्रक्रियेस पुर्व सुचना न देता मंजुर करणे/नामंजुर करणे/तहकूब करणे/रद्द् करणे /निविदा स्वीकारण्याचे-नाकारण्याचे कोणत्याही कारणास्तव काही कारण न देता इ. बाबतचे संपुर्ण अधिकार निम्न स्वाक्षरीकारांकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.**

| Sr.no | Type of Waste papers and Scrap for disposal | Qty of Waste papers(Raddi) and scrap (Bhangar)(in Kgs) | NAME OF DEPT. |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| **1** | MANUALS (PAPER WASTE (RADDI)) | 563.2KGS | AUTOMOBILE ,APPLIED MECHANICS ,SCIENCE, COMPUTER,WORKSHOP |
| **2** | TEST PAPERS (PAPER WASTE (RADDI)) | 109.2KGS | AUTOMOBILE,MECHANICAL, SCIENCE AND COMPUTER |
| **3** | DRAWING SKETCH BOOKS/SHEETS (PAPER WASTE (RADDI)) | 21.5KGS | AUTOMOBILE AND MECHANICAL |
| **4** | NEWSPAPERS (PAPER WASTE (RADDI)) | 276KGS | LIBRARY |
| **5** | PACKING BOXES (PAPER WASTE (RADDI)) | 37KGS | AUTOMOBILE |
| **6** | STUDENTS NOTE BOOKS (PAPER WASTE (RADDI)) | 83KGS | COMPUTER |
| **7** | M.S.STAND /M.S.HOOKS OLD STUDENT JOB (SCRAP(BHANGAR)) | 89KGS | WORKSHOP |
| 8 | G.I.TRAY BIG SIZE OLD STUDENTS JOB (SCRAP(BHANGAR)) | 30 KGS | WORKSHOP |
| 9 | G.I.TRAY SMALL SIZE OLD STUDENTS JOB (SCRAP(BHANGAR)) | 14 KGS | WORKSHOP |
| 10 | M.S.SCRAP (SCRAP(BHANGAR)) | 150 KGS | HOSTEL |

(डॉ.आर .जी .वाडेकर )
प्राचार्य
शिक्षण महर्षि दादासाहेब रावल
शासकीय तंत्रनिकेतन धुळे

प्रत माहीतीकरिता सविनय सादर :-

१) मा संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य , ३, महापालिका मार्ग , पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई -४०० ००१- यांना माहितीस्तव व संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर

२) मा सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , शासकीय तंत्रनिकेतन परिसर सामनगांवरोड, नाशिक रोड, नाशिक - ४२२ १०१ -यांना माहितीस्तव व संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव सविनय सादर

३) विभाग प्रमुख, संगणक, शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे यांना - संस्थेच्या संकेत स्थळावर प्रदर्शित करणेस्तव.

४) विभाग प्रमुख - उपयोजति यंत्रशास्त्र /संगणक / यंत्र/स्वयंचलन /वसतगृिह/सायन्स / कर्मशाळा/वसतिगृह /ग्रंथालय शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे -यांना माहितीस्तव-इमेल द्वारे

५) कार्यालय विभाग, शिक्षण महर्षि दादासाहेब रावल शासकीय तंत्रनिकेतन, धुळे यांना माहीतीस्तव व मुख्य सुचना फलकावर प्रदर्शित करणेस्तव